जैवसंरक्षणाविषयी कायद्यांची थोडक्यात माहिती

# अनुसूचित जमाती आणि अन्य परंपरागत जंगलवासी (जंगल अधिकार मान्यता) कायदा, २००६

KALPAVRIKSH

कल्पवृक्ष

कल्पवृक्ष एन्व्हायरन्मेंट ॲक्शन ग्रुप

# अनुसूचित जमाती आणि अन्य परंपरागत जंगलवासी (जंगल अधिकार मान्यता) कायदा, २००६[१]

हा कायदा जंगलात राहणाऱ्या अनुसूचित जमाती तसेच परंपरागत पिढ्यानूपिढ्या जंगलात राहत आलेल्या अन्य सुमदायांना जंगलविषयक अधिकार देतो. या कायद्याचा हेतू ज्या समुदायांचे जंगल अधिकार आजवर कायदेशीररीत्या नोंदवले गेले नाहीत त्यांच्यावरील ऐतिहासिक अन्याय दूर करणे हा आहे.

हा कायदा जम्मू आणि काश्मिर राज्य वगळता भारतात अन्य सर्वत्र लागू आहे.

## १. या कायद्याअंतर्गत अधिकारांसाठी कोण दावा करू शकतात?

दोन प्रकारांचे लोक या कायद्याअंतर्गत अधिकारांसाठी दावा करू शकतात.

- ''जंगलात राहणाऱ्या अनुसूचित जमाती'' - जे प्राथमिकत: जंगलात राहतात व आपल्या उपजीविकेसाठी (उदरनिर्वाह) जंगल व जंगल जमिनीवर[२] अवलंबून आहेत असे अनुसूचित जमातीचे सदस्य. यांमध्ये अनुसूचित जमातींमधील ढोरचराऊ समाजांचाही समावेश आहे.
- ''अन्य परंपरागत जंगलवासी'' - जे १३ डिसेंबर, २००५ पूर्वी किमान ३ पिढ्यांपासून प्राथमिकत: जंगलात राहताहेत आणि आपल्या उदरनिर्वाहासाठी जंगल व जंगल जमिनीवर अवलंबून आहे असे कोणीही.

---

१. ही टिप्पणी दिव्या राधाकृष्णन् आणि ध्रुव सिंग, सिंबायोसिस लॉ कॉलेज, (पुणे) यांनी 'कल्पवृक्ष'साठी अशिष कोठारी व नीमा पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केली. तेजस्विनी आपटे व एरिका तारापोरवाला यांनी संपादकीय सूचना केल्या. या टिप्पणीचा उद्देश कायद्यातील महत्त्वाच्या तरतूदी सोप्या शब्दात सांगणे हा असून टिकात्मक विश्लेषणाचा नाही.

२. 'जंगल जमीन' याचा अर्थ कायदेशीररीत्या 'जंगल' म्हणून वर्गीकृत केलेली जमीन (तिची सद्य पर्यावरणीय स्थिती काहीही असली तरीही)

## २. कोणत्या प्रकारचे अधिकार दिले जाणार आहेत?

व्यक्ती किंवा समुदाय (किंवा दोन्ही) पुढील प्रकारच्या अधिकारांसाठी दावे करू शकतात (कलम ३) :

१. वैयक्तिक वा समुदायिकरीत्या जंगल जमीन धारण करणे[३] आणि त्यावर निवास करणे.
   
   या अधिकारांसाठी चार अटी आहेत:
   
   (अ) जमिनीचा वापर निवासासाठी किंवा उदरनिर्वाहासाठी केलेल्या मशागतीसाठीच झाला पाहिजे.
   
   (ब) १३ डिसेंबर २००५ पूर्वीपासून जमीन धारण केलेली असली पाहिजे.
   
   (क) प्रत्यक्ष धारण केलेल्या क्षेत्रापुरत्या मर्यादित जमिनीसाठीच दावा असला पाहिजे.
   
   (ड) जमीन चार हेक्टर्सहून अधिक असू नये.

२. संस्थाने, जमीनदारी वा अन्य तत्सम राजवटींच्या काळातील किंवा निस्तारासारखे (वापर अधिकार) समुदायाधारित अधिकार.

३. गावाच्या हद्दीच्या आत वा बाहेर परंपरागतरित्या गोळा करीत आलेले किरकोळ वनोपज गोळा करण्याचा, वापरण्याचा आणि (त्याचा) विनियोग करण्याचा अधिकार. 'किरकोळ वनोपजा'मध्ये लाकडाव्यतिरिक्त अन्य सर्व वनस्पतिजन्य उत्पादनांचा समावेश होतो. (बांबू, मध, मेण, लाख, तेंदू, केंदू, औषधी वनस्पती, जडीबूटी, कंदमुळे, रेशीम कोश, काटक्यांची मोळी आणि तत्सम).

४. वापरायचे व ताब्याचे अन्य समुदायाधारीत अधिकार जसे की, मासे व पाण्यातील अन्य उत्पादनांचा अधिकार, चराई वा नैसर्गिक संसाधनांच्या परंपरागत मौसमी वहिवाटी वा भटक्या व ढोरराख्या समुदायांचा अधिकार.

५. आदिम अनुसूचित जमाती आणि शेतीपूर्व समुदायांचे अधिवास आणि निवासस्थानविषयक समुदायाधारित मुदताधिकार.

३. 'धारण करणे' याचा अर्थ विनाशर्त मालकी (निर्विवाद) असा होतो वा नाही हे स्पष्ट नाही.



६. ज्या राज्यात अशा जमिनींच्या दाव्यांबाबत वाद आहेत अशा कोणत्याही प्रकारच्या जमिनींमध्ये/जमिनींवर अधिकार.

७. कोणत्याही स्थानिक अधिकार मंडळाने वा राज्य शासनाने जंगलजमिनीवर दिलेल्या भाडेपट्ट्या, अनुदाने व पट्टे हक्कामध्ये रूपांतरित करण्याचा अधिकार.

८. खालील प्रकारची निवासस्थाने महसूली गावात रूपांतरित करण्याचा अधिकार :
   
   वनगावे, जुनी निवासस्थाने[४], सर्व्हे न झालेली गावे आणि जंगलातील अन्य गावे. यामध्ये नोंदणी व जाहीर झालेल्या तसेच न झालेल्या गावांचा आणि वस्तीस्थानांचा समावेश होतो.

९. व्यक्ती अथवा समुदाय परंपरागत शाश्वत वापरासाठी संरक्षित व संवर्धन करीत आलेल्या कोणत्याही सामुहीक संरक्षित वनाचे रक्षण, संवर्धन, व्यवस्थापन व पुनरूज्जीवन करण्याचा अधिकार.

१०. खालीलपैकी कोणत्याही कायद्याने मान्य केलेले अधिकार-
   
   (१) राज्य कायदे
   
   (२) स्वायत्त जिल्हा प्रशासकीय मंडळाचे कायदे
   
   (३) कोणत्याही स्वायत्त विभागीय प्रशासकीय मंडळाचे कायदे
   
   (४) कोणत्याही राज्याने अथवा जमातीच्या परंपरेनुसार वा चालीरीतींनुसार मान्य झालेले संबंधित जमातींचे अधिकार

११. जैवविविधतेच्या वहिवाटीचे तसेच जैवविविधता आणि सांस्कृतिक विविधतेचे बौद्धिक संपदेचे अधिकार.

१२. वर न उल्लेखलेले मात्र परंपरागत उपभोगत आलेले अन्य कोणतेही अधिकार. मात्र यामध्ये वन्यजीवाची शिकार, फासेपारध व त्याच्या शरीराचा कोणताही भाग काढून घेणे याविषयीच्या परंपरागत अधिकारांचा समावेश नाही. (वन्यजीवाचा अर्थ प्राण्याची कोणतीही प्रजात जी वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ च्या परिशिष्ट I ते IV मध्ये नमूद केली आहे.)

४. निवासस्थाने याची व्याख्या केलेली नाही. बहुधा ही गावे महसूली वा वनगावे या दोन्हीही याद्यांत नमूद केलेली नसावीत.

१३. जेथे बेकायदेशीररीत्या व पुनर्वसनाचे कायदेशीर अधिकार न मिळता जंगलजमिनीवरून हकालपट्टी वा विस्थापन झाले असेल त्यांना व्यक्तींच्या वा समुदायांच्या सध्या धारण केलेल्या वा पर्यायी जमिनीवर त्यांचा पुनर्वसनाचा अधिकार.

१४. विविध सुविधांचा अधिकार. शासनाने व्यवस्थापन करण्याच्या पुढील सुविधांसाठी केंद्रशासन जंगलजमिनीचा वापर करू शकते, आणि वन संवर्धन कायद्यापासून ह्या जमिनी मुक्त असू शकतात.

(१) शाळा
(२) दवाखाने वा इस्पितळे
(३) रास्त भाव दुकाने
(४) दूरध्वनी व विद्युत तारा
(५) टाक्या आणि अन्य किरकोळ पाणवठे
(६) पिण्याचे पाणी आणि पाण्याच्या पाईपलाईन
(७) किरकोळ सिंचन कालवे
(८) पाणी वा पावसाचे पाणी संधारणाची यंत्रणा
(९) उर्जेचे अपारंपारिक स्रोत तंत्रिक प्रशिक्षण व कौशल्यविकास अध्ययन वर्ग
(१०) अंगणवाड्या
(११) रस्ते
(१२) समुदाय केंद्रे

पण जंगलजमिनीचा असा वापर तेव्हाच केला जाऊ शकतो जेव्हा :

- प्रत्येक बाबतीत वापरली जाणारी जंगलजमीन १ हेक्टरहून कमी आहे.
- प्रतिहेक्टर ७५ (वा त्याहून कमी) झाडेच तोडली जाणार आहेत.
- विकास प्रकल्पासाठी ग्रामसभेची मंजूरी आहे.

जे राज्य शासनाच्या कामांसाठी निवासस्थानावरून तसेच शेतजमिनीवरून जमिनीच्या भरपाईशिवाय विस्थापित केले गेले आहेत आणि ज्या जमिनीवरून विस्थापित केले ती जमीन शासनाने संपादित करताना सांगितलेल्या कारणांसाठी संपादित केल्यापासून पाच वर्षांच्या आत वापरली नाही असे सिद्ध करू शकले आहेत अशा अनुसूचित जमाती आणि परंपरागत जंगलवासींना ज्या जमिनीवरून विस्थापित केले गेले त्या जमिनी परत मिळण्याचा अधिकार [कलम ४ (८)].



## ३. अधिकार वारशाने मिळू शकतात का किंवा हस्तांतरित करता येऊ शकतात का?

अधिकार वारसा हक्काने मिळू शकतात मात्र अन्य कोणालाही हस्तांतरित करता येत नाहीत. हे अधिकार इतरांना स्वाधीन करता येत नाहीत. जसे की- या अधिकारांची नोंदणी पती व पत्नी अशा दोहोंच्याही किंवा जेथे एक व्यक्तीच कुटुंबप्रमुख असेल तेथे त्या व्यक्तीच्या नावाने होईल. जेथे थेट वारस नसेल तेथे अधिकार जवळच्या नातेवाईकाला वारसाहक्काने मिळतील [कलम ४ (४)].

## ४. वरील अधिकारांचे दावे दाखल करण्यापूर्वी जंगलवासींची हकालपट्टी केली जाऊ शकते का?

अनुसूचित जमाती व अन्य कोणीही परंपरागत जंगलवासी समुदायाच्या सदस्याने धारण केलेल्या जमिनीवरून त्याच्या/तिच्या अधिकाऱ्याच्या दाव्याची छाननी व मान्यता प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हकालपट्टी होऊ शकत नाही [कलम ४ (५)].

## ५. कोणत्या प्रकारच्या जमिनींवर हे अधिकार दिले जाऊ शकतात?

सर्व प्रकारच्या 'जंगल जमिनींवर' अधिकार दिले जाऊ शकतात, ज्यांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''कोणत्याही वनक्षेत्रात येणारी कोणत्याही प्रकारची जमीन, ज्यामध्ये अवर्गीकृत जंगले, बिगर सीमांकीत जंगले, सध्या अस्तित्वात असणारे वा प्रस्तावित जंगल, संरक्षित जंगल, राखीव जंगल, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने समाविष्ट आहेत.

## ६. संरक्षित क्षेत्रांतील अधिकारांविषयी काय नियम आहेत?

वन्यजीव (संरक्षण) कायद्याअंतर्गत घोषित केलेल्या अभयारण्यांसाठी तसेच राष्ट्रीय उद्यानासाठी या कायद्यात विशेष तरतूदी आहेत. राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्यांच्या सीमेच्या आतील (बाहेरील नव्हे) भाग 'संवेदनशील वन्यजीव अधिवास' (क्रिटिकल वाइल्डलाइफ हॅबिटॅट) म्हणून घोषित करता येऊ शकतात. असे भाग वन्यजीव संवर्धनाच्या हेतूने 'वर्ज्य' ठेवण्यासाठी 'शास्त्रीय आणि ढोबळ' निकषांवरून निश्चित

केले जातील. अशा क्षेत्रांची निवड आणि घोषणा तज्ञ समितीच्या ज्यामध्ये स्थानिक तज्ञांचाही समावेश होतो- सोबत चर्चात्मक प्रक्रियेतून केली जाईल.

वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने निर्माण करायच्या 'वर्ज्य' क्षेत्रांच्या निर्मितीसाठी- जंगल अधिकार धारकांच्या अधिकारांवर परिणाम होणार नाहीत अशा बेताने राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्यांमधील 'संवेदनशील वन्यजीव अधिवासांमध्ये' या कायद्यात मंजूर अधिकारांमध्ये बदल केले जातील.

मात्र, खाली नमूद केलेल्या सर्व अटी पूर्ण होतात असे आढळेल तेव्हा अधिकारांवर गदा येईल आणि पुनर्वसन केले जाऊ शकेल [कलम ४ (२)]:

१. जेव्हा अधिकार मान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाली असेल.

२. राज्य शासनाच्या वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ अंतर्गत निर्मित सर्व संबंधित समित्यांनी सिद्ध केले असेल की, अधिकार धारकांच्या वास्तव्याचा वा उपक्रमांचा वन्यजीवांच्या जीविताला तसेच अधिवासाला कायमस्वरूपी धोका आहे.

३. जेव्हा राज्य शासनाने अन्य कोणतेही व्यवहार्य पर्याय उपलब्ध नाहीत असा निर्णय घेतला असेल (जसे की, अधिकार धारक व वन्यजीवांचा सहवास).

४. केंद्र शासनाच्या संबंधित धोरणांनुसार, गरजांची पूर्तता, उदरनिर्वाहाची आणि योग्य हमी यांचा समावेश असणारी पर्यायी योजना वा पुनर्वसन योजना अधिकारधारकांना कळवली असेल.

५. प्रस्तावित पुनर्वसनाला संबंधित ग्रामसभेने खुली व विनाशर्त लेखी मंजुरी दिलेली असेल.

६. पुनर्वसन स्थळावर जमिनीचे वाटप तसेच अन्य सुविधांची पूर्तता झाली असेल. हे होईपर्यंत पुनर्वसन पूर्ण होणार नाही. ज्या 'संवेदनशील वन्यजीव अधिवासातून' अधिकारधारकांचे वन्यजीव संवर्धनाच्या कारणाखाली स्थलांतर झाले असेल त्याचा वापर केंद्र वा राज्य शासनाकडून अन्य कोणत्याही कारणासाठी केला जाऊ शकणार नाही.



## ७. अधिकारधारकांच्या संवर्धनविषयक काही जबाबदाऱ्या आहेत का?

कोणत्याही जंगल अधिकारधारक - ज्यामध्ये ग्रामसभा आणि गावपातळीवरील संस्थांचा समावेश आहे. (जेथे जंगलअधिकार धारक आहेत तेथे) पुढील बाबींसाठी 'क्षमतासिद्ध'[५] आहेत (कलम ५):

१) वन्यजीव, वन आणि जैवविविधता संरक्षण.

२) आसपासची पाणलोट क्षेत्रे, पाण्याचे स्रोत आणि पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील अन्य जागा पुरेशा संरक्षित असल्याची खात्री करणे.

३) जंगलात राहणाऱ्या अनुसूचित जमाती आणि अन्य पारंपारिक जंगलवासी असलेल्या अधिवासात कोणत्याही प्रकारच्या विध्वंसक कृत्यांपासून संबंधित समुदायांच्या सांस्कृतिक वा जंगल वारशा जतन होते आहे हे पाहणे.

४) ग्रामसभेने समुदायांचा जंगल स्रोतांचा वापर नियंत्रित करण्यासाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होते हे पाहणे तसेच वन्यजीव, वन आणि जैवविविधतेवर अनिष्ट परिणाम होईल अशी कृत्ये थांबवणे.

## ८. या कायद्याअंतर्गत कोणती अधिकारमंडळे आहेत? (कलम ६)

१. ग्रामसभा : ग्रामसभा ही आपल्या स्थानिक अधिकारक्षेत्रात येणाऱ्या व्यक्ती आणि समुदायांच्या जंगल अधिकारांचे स्वरूप व प्रमाण निश्चित करणारे अधिकारमंडळ आहे. ग्रामसभा दावे स्वीकारेल, त्यांना संकलित करून तपासणी करेल, प्रत्येक दाव्याशी संबंधित क्षेत्राचा नकाशा तयार करेल, दावा मांडून त्याविषयी ठराव संमत करेल, आणि दावा तसेच ठरावाची प्रत उप-विभागीय समितीकडे पाठवेल.

२. उप-विभागीय समिती : राज्य सरकार उप-विभागीय समिती स्थापन करेल जी, ग्रामसभेने मंजूर केलेले संबंधित ठराव तपासेल, जंगल अधिकारांची नोंद तयार करेल, आणि सदर नोंद उप-विभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा-स्तरीय समितीकडे अंतिम निर्णयासाठी पाठवेल.

---

५. 'क्षमतासिद्ध' या शब्दाची व्याख्या केलेली नाही. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कायद्यानुसार 'क्षमतासिद्ध' या शब्दातच 'अधिकारधारकांच्या कर्तव्यांचाही' समावेश आहे.

३. जिल्हा स्तरीय समिती : राज्य सरकार जंगल अधिकारांच्या नोंदीला अंतिम मान्यता देण्यासाठी जिल्हा-स्तरीय समिती स्थापन करेल.

४. राज्य स्तरीय देखरेख समिती:-

जंगल अधिकारमान्यतेच्या प्रक्रियेवर देखरेखीसाठी राज्य शासन एक राज्यस्तरीय देखरेख समिती प्रस्थापित करेल. जर आवश्यकता असल्यास, राज्यस्तरीय देखरेख समिती, केंद्र स्तरीय सुकाणू समितीला अहवाल सादर करेल.

५. केंद्रस्तरीय सुकाणू समिती: केंद्र शासनाचे आदिवासी मंत्रालय किंवा केंद्र शासनाने मान्यता दिलेले कोणतेही अधिकार मंडळ अथवा अधिकारी या कायद्यासाठी सुकाणू समिती म्हणून कार्य करतील.

## ९. उप-विभागीय समिती, जिल्हास्तरीय समिती आणि राज्यस्तरीय देखरेख समितीवर कोण असेल?

राज्य शासनाच्या महसूल खाते, वनखाते आणि आदिवासी विभागाचे अधिकारी आणि पंचायची राज संस्थांचे प्रतिनिधी हे उप-विभागातील समिती, जिल्हास्तरीय समिती आणि राज्यस्तरीय देखरेख समितीवर असतील. पंचायती राज संस्थेच्या प्रतिनिधींमध्ये अनुसूचित जमातीचे तसेच महिला सदस्य असतील.

## १०. एखादी व्यक्ती या अधिकारमंडळांनी मंजूर केलेल्या ठरावाविरुद्ध वा निर्णयाविरुद्ध दाद मागू शकते का? (कलम ६)

ठराव संमत झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत ग्रामसभेच्या ठरावाने बाधित कोणीही व्यक्ती उप-विभागीय समितीकडे याचिका सादर करू शकते. असंतुष्ट व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची योग्य संधी मिळाल्याशिवाय उप-विभागीय समिती असंतुष्ट व्यक्तीची तक्रार निकालात काढू शकत नाही.

उप-विभागीय समितीच्या निर्णयावर असंतुष्ट व्यक्ती निर्णयापासून ६० दिवसांच्या आत जिल्हास्तरीय समितीकडे याचिका दाखल करू शकते. जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.



## ११. कायद्याचे उल्लंघन केल्यास कोणत्या शिक्षांची तरतूद आहे? (कलम ७)

कोणत्याही अधिकारमंडळाने, समितीने अथवा समितीच्या सदस्याने, या कायद्यातील तरतूदींचा अथवा नियमांचा भंग केल्यास त्यांच्याविरूद्ध फिर्याद दाखल होईल तसेच १००० रू. पर्यंत दंड होऊ शकेल. मात्र, सदर कायदेभंग हा अनवधानाने व कोणत्याही अनिष्ट हेतूने न झाल्याचे सिद्ध करू शकल्यास त्यांना दोषी ठरवण्यात येणार नाही.

## १२. हा कायदा केव्हापासून अंमलात येईल?

हा कायदा डिसेंबर २००६ मध्ये मंजूर झाला असून १ जानेवारी, २००८ पासून या कायद्याअंतर्गत प्रसारित केलेल्या नियमांसहित अंमलात आला आहे.

जैवसंरक्षणाविषयी कायद्यांची थोडक्यात माहिती
**अनुसूचित जमाती आणि अन्य परंपरागत जंगलवासी (जंगल अधिकार मान्यता) कायदा, २००६**
**प्रकाशक** : 'कल्पवृक्ष' फ्लॅट नं ५, श्री दत्त कृपा, ९०८ डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४.
**फोन** : ९१-२०-२५६७५४५०
**फॅक्स** : ९१-२०-२५६५४२३९
**ईमेल** : kvoutreach@gmail.com
**वेबसाईट** : www.kalpavriksh.org
**डिझाईन** : मधुवंती अनंतराजन
**अनुवाद/भाषांतर** : रोहन जोशी, प्रदीप चव्हाण
**निधी** : मिझेरिऑर, आखेन, जर्मनी